# 7.1.8_2.Reports of the activities

## INDEX

| Sr. No | Activities |
|---|---|
| 1 | Aksharyatra |
| 2 | Ashadi Ekadashi |
| 3 | Nagpanchami |
| 4 | Marathi Basha Diwas |
| 5 | Rakshabandhan Celebration |

Smt. Durgadevi Sharma Charitable Trust's
# Chandrabhan Sharma College
of Arts, Commerce & Science
(Hindi Linguistic Minority Institution)
(Affiliated to the University of Mumbai)
Accredited by NAAC 'B+'

AKSHARYATRA

## वृत्तांत

### मराठी वाङ्मय मंडळ (२०२२ - २३)

| Particulars | Description |
|---|---|
| Name of the event | 'अक्षरयात्रा : खेळ अक्षरांचा' |
| Date of the event | ३१ मार्च २०२३ |
| Time | सकाळी ११.३० ते १२.३० |
| Venue | वर्ग क्र. ६०१ |
| Description of the Event | मराठी वाङ्मय मंडळांतर्गत दिनांक ३१ मार्च २०२३ रोजी 'अक्षरयात्रा : खेळ अक्षरांचा' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा नवीन होती. एकूण २२ विद्यार्थी अत्यंत उत्साहाने या स्पर्धेत सहभागी झाले. स्पर्धेचे स्वरूप विद्यार्थ्यांना स्पष्ट केले होते. स्पर्धेसाठी मराठी वर्णाक्षरातील 'स' हे अक्षर निवडण्यात आले. १० मिनिटांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना 'स' अक्षराच्या बाराखडीला आधारभूत ठेऊन शब्द बनवायचे व लिहायचे होते. विद्यार्थ्यांनी १० मिनिटांत ३० ते ६० शब्द लिहिले मात्र त्या शब्दांचा अर्थ सांगताना आणि शब्दांची वाक्यरचना करताना विद्यार्थ्यांचा थोडासा गोंधळ उडत होता. यातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन होत होते. इतर विद्यार्थी त्यांना मदत करत होते. अशाप्रकारे खेळ आणि मनोरंजनातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करण्याचा हा छोटासा प्रयत्न होता. |
| Outcome of the Event | • खेळ आणि मनोरंजनातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण होण्यास मदत मिळेल. |

| | |
|---|---|
| | • शब्दांच्या अर्थासाठी आणि वाक्यरचनेसाठी एकमेकांना साहाय्य केल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना वाढीस लागेल.<br>• भविष्यात विद्यार्थी मराठीतील नवीन शब्दांविषयी अधिक माहिती घेण्यासाठी प्रयत्नशील राहतील. |

डॉ. प्रतिभा जयवंत
संचालिका, मराठी वांड्मय मंडळ

## ASHADI EKADASHI

## वृत्तांत

**मराठी वाङ्मय मंडळ (२०२२ - २३)**

| Particulars | Description |
|---|---|
| Name of the event | आषाढी एकादशी सोहळा |
| Date of the event | ०९ जुलै २०२२ |
| Time | सकाळी ११.०० वाजता |
| Venue | वर्ग क्र. ५०२ |
| Description of the Event | मराठी वांङ्मय मंडळांतर्गत दिनांक ०९ जुलै २०२२ रोजी साजरा करण्यात आलेला आषाढी एकादशीचा कार्यक्रम मोठ्या भक्तीभावाने आणि उत्साहात पार पडला.<br>या सोहळ्याला सर्व शिक्षकगण आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित राहिले. मंडळाच्या विद्यार्थी वर्गाने पारंपरिक वेश परिधान केला होता. या कार्यक्रमात एकूण ३८ विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात पालखी आगमन सोहळा आणि दीपप्रज्वलनाने झाली. कु. नेहा खडस हिने कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. प्रतिमा सिंह यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत मार्गदर्शन केले. कु. श्रेयस लिंगसूर आणि कु. निमिषा किंजरकर यांनी आषाढी एकादशीची माहिती आणि महत्व सविस्तर सांगितले. कु. वर्षा गौड हिने आभार प्रदर्शन केले.<br>सोहळ्याचे मुख्य आकर्षण दिंडी होते. कार्यक्रमानंतर दिंडी काढण्यात आली. यामध्ये मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. टाळ, |

| | |
|---|---|
| | मृदुंग, लेझीम आणि विठ्ठलाच्या जयघोषाने अवघे महाविद्यालय भरावून गेले.<br>शेवटी कु. श्रेयस लिंगसूर याने उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता केली. |
| Outcome of the Event | • शिक्षकगण, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मित्र - मैत्रिणींना आषाढी एकादशी विशेष माहिती आणि महत्त्व समजले.<br>• महाराष्ट्राची संस्कृती आणि सण यांचा निसर्गाशी असलेला संबंध याविषयी जाणीव झाली.<br>• कार्यक्रमासाठी पालखी बनविणे, इतर साहित्य जमा करणे, इत्यादी कार्यात सहभाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना जागृत होण्यास मदत मिळेल. |

डॉ. प्रतिभा जयवंत

संचालिका, मराठी वांड्मय मंडळ

**NAAGPANCHMI**

## वृत्तांत

### मराठी वाड्मय मंडळ (२०२२ - २३)

| Particulars | Description |
|---|---|
| Name of the event | नागपंचमी सण |
| Date of the event | २ ऑगस्ट २०२२ |
| Time | सकाळी ११.०० वाजता |
| Venue | वर्ग क्रमांक ५०२ |
| Resource Person | सर्पमित्र श्री. जय जोशी<br>सर्पमित्र श्री. कुणाल ठक्कर<br>NGO, RAWW |
| Details of The Resource Person | सर्पमित्र श्री. जय जोशी<br>**भ्रमणध्वनी :** ८०९७४६९७१<br>**Email ID:** Jayjoshi20655@gmail.com<br><br>सर्पमित्र श्री. कुणाल ठक्कर<br>**भ्रमणध्वनी :** ९८३३०१७९०३<br>**Email ID:** kunalthakkar131@gmail.com |
| Description of the Event | मराठी वाड्मय मंडळांतर्गत दिनांक ०२ ऑगस्ट २०२२ रोजी साजरा करण्यात आलेला नागपंचमीचा सण उत्साहात पार पडला. नागपंचमी सणाचे औचित्य साधून "सण याविषयी विद्यार्थी मित्र- निसर्ग आणि वैज्ञानिक दृष्टिकोन" मैत्रिणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना शास्त्रशुद्ध माहिती मिळावी म्हणून विशेषतः NGO, RAWW या प्राणी व पक्षी प्रेमी संस्थेमार्फत सर्पमित्रांना बोलवण्यात आले होते. |

| | |
|---|---|
| | टाकला. त्यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आणि उपस्थित शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त व प्रभावी ठरले. कु. वर्षा गौंड हिने आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. |
| Outcome of the Event | • उपस्थित विद्यार्थी- विद्यार्थिनी, शिक्षक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी यांना नागपंचमी सणामागील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजली.<br>• उपस्थितांना भविष्यात परंपरा आणि विज्ञान यांची सांगड घालता येईल.<br>• उपस्थितांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागण्यास मदत मिळेल. |

डॉ. प्रतिभा जयवंत

संचालिका, मराठी वांङ्मय मंडळ

Smt. Durgadevi Sharma Charitable Trust's
Chandrabhan Sharma College
of Arts, Commerce & Science
(Hindi Linguistic Minority Institution)
(Affiliated to the University of Mumbai)
Accredited by NAAC 'B+'

## MARATHI BHASHA DIWAS

# वृत्तांत

## मराठी वाङ्मय मंडळ (२०२२-२३)

| Particulars | Description |
|---|---|
| Name of the event | मराठी भाषा दिन आणि शिव जयंती उत्सव |
| Date of the event | ०४ मार्च २०२३ |
| Time | दुपारी १२ वाजता |
| Venue | वर्ग क्रमांक ५०२ |
| Description of the Event | मराठी वांङ्मय मंडळांतर्गत "मराठी भाषा दिन आणि शिव जयंती उत्सव" दिनांक ०४ मार्च २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. आपले लाडके कवी "कुसुमाग्रज" आणि प्रेरणास्थान स्वराज्य संस्थापक "शिवाजी महाराज" यांच्या जयंतीचा उत्साह विद्यार्थ्यांमध्ये संचारला होता.<br>विद्यार्थ्यांनी अतिशय मेहनतीने आणि चिकाटीने सजावट, रांगोळी आणि पालखीचे आयोजन केले. तसेच कुसुमाग्रजांविषयी माहिती, कुसुमाग्रजांच्या कविता वाचन, लेझिम नृत्य आणि शिवाजी महाराजांची पालखी, शिवाजी महाराजांविषयी माहिती, किल्ल्यांची माहिती, इत्यादि अशाप्रकारे कार्यक्रमाचे नियोजन केले होते.<br>शिक्षकगण, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वर्ग उपस्थित राहीला होता. विद्यार्थी वर्गाने पारंपारिक वेश परिधान केला होता. या कार्यक्रमासाठी एकूण 52 विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदविण्यात आली. कु समिक्षा रायकर (SYBAF) हिने कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन केले. दीपप्रज्वलनाने आणि प्रतिमा पुजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कु. लावण्या (SYIT) हिने कुसुमाग्रजांचा अल्प-परिचय करून |

| | |
|---|---|
| | दिला आणि कु. श्रेयस लिंगसूर (TYBCOM) याने कुसुमाग्रजांची सुप्रसिध्द कविता 'कणा' सादर केली.<br>कु. वैष्णवी (SYBMS) हिने छत्रपती शिवाजी महाराजांना मनाचा मुजरा करत त्यांच्याविषयी थोडक्यात माहिती दिली. तिला साथ देताना कु. दिपेश गावकर (TYBCOM) याने महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांची माहिती देत आपल्या आदर्श राजाच्या कर्तृत्वाची ओळख करून दिली<br>शेवटी कु. समिक्षाने (SYBAF) उपस्थितांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता केली. |
| Outcome of the Event | • शिक्षकगण, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मित्र-मैत्रिणींना स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज आणि मराठी साहित्यातील अजिंक्य तारा कवी कुसुमाग्रज यांच्याविषयी माहिती मिळाली.<br>• मराठी भाषेच्या वापराला आणि विकासाला चालना देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषेच्या महत्त्वाबद्दल जागरुकता निर्माण करण्याकरीता मराठी भाषा दिन साजरा करणे उपयुक्त ठरले.<br>• कुसुमाग्रज लिखित कवितांचे वाचन करताना विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची गोडी निर्माण झाली.<br>• शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाच्या आठवणी उपस्थित श्रोत्यांना एक वेगळेच बळ देऊन गेल्या.<br>• महाराष्ट्रातील शिवाजी महाराजांचा पराक्रम जाणून घेण्यास विद्यार्थी अधिक प्रवृत्त झाले. |

| | |
|---|---|
| | • साहित्य जमा करणे, पालखी बनविणे, इत्यादी कार्यात सहभाग घेतल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकोप्याची भावना जागृत होण्यास मदत मिळाली. |

डॉ. प्रतिभा जयवंत

संचालिका, मराठी वांड्मय मंडळ

Smt. Durgadevi Sharma Charitable Trust's
Chandrabhan Sharma College
of Arts, Commerce & Science
(Hindi Linguistic Minority Institution)
(Affiliated to the University of Mumbai)
Accredited by NAAC 'B+'

## RAKSHABANDHAN CELEBRATION

**हिन्दी भाषा समिति**

**रक्षाबंधन समारोह**

**रिपोर्ट**

चंद्रभान शर्मा महाविद्यालय विज्ञान,व वाणिज्य, हिन्दी भाषा समिति द्वारा **रक्षाबंधन समारोह** 13 अगस्त को दोपहर 12 बजे आयोजित की गई I जिसमें सभी शिक्षकों अथवा छात्र परिषदसदस्य को आमंत्रित किया गया इस समारोह के दिन विद्यार्थियों ने बड़े जोश और उल्लास के साथ भाग लिया। श्रीमती आशा भारद्वाज एक संसाधन व्यक्ति थीं। वह सभी शिक्षकों और छात्र सदस्यों की परिषद के माथे पर तिलक और हाथ में पट्टी बांधकर सभी सदस्यों का स्वागत करती हैं। वह अंत में विद्यार्थियों को मिठाई भी देती हैं। श्रीमती भारद्वाज मैम रक्षा के महत्व को समझाती हैं और भारत में यह त्योहार क्यों मनाया जाता है. कार्यक्रम में भाग लेने वालों की कुल संख्या 35 है

धन्यवाद और सादर
संयोजक - रवि विश्वकर्मा

I